म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ११९८

# हित्याचा नवा दृष्टिकोन

: लेखक :

**जनार्दन वाघमारे**
कार्यवाह, महाराष्ट्र दलित साहित्य संघ

महाराष्ट्र दलित साहित्य संघाचें दुसरें प्रकाशन

**किंमत ४० न. पैसे**

REFBK-0010243

प्रकाशक : जनार्दन वाघमारे, C/o कार्यालय, महाराष्ट्र दलित साहित्य संघ, वरळी, बी. डी. डी. चाळ नं. ६०/३५, मुंबई १८.
मुद्रक : शरद कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

REFBK-0010243
अनुक्रम २५५६७८ दि:
क्रमांक ११९८८
९०२८३

खेड्यापाड्यांत सराई सुगी हाताशीं आलेली आहे. पिकें शेतांमध्यें दिमाखानें डोलत आहेत, पहाट वारा वहात आहे. कोंबड्यानें बांग दिली आहे. शेतावर काढणी करावयास निघालेलें शेतकरी आणि श्रमकरी पिकांच्या काढणीला सुरवात करतात. विळा ताटाला लावताच भलरीच्या रुपानें आपला आनंद व्यक्त करतांना सृष्टीनें केलेल्या उपकाराची परत फेड भलरीनें करीत असतां ' भलरीदादा भलगडी दादा ' या शब्दांनीं मन आनंदून जाते त्याचवेळीं मळ्यांत चाललेल्या मोटेवरील गाण्याच्या लहरीनें, मोटेच्या कण्याच्या कुहीकुहीनें आजूबाजूचा परिसर भरून जातो. जवळच जात्यावर बसलेल्या माऊलीचा मंजूळ आवाज येतो. तिनें गायीलेल्या ओव्यांच्या मधूर नादानें मन तृप्त होतें. अशा तऱ्हेनें कामकऱ्यांच्या आणि श्रमकऱ्यांच्या जीवनांच्या दिनक्रमाला सुरवात होतें. आजपर्यंत ही भलरी गीतें, ओवी गीतें, मंजूळ गाणीं संग्रही करण्याचा खटाटोप फारसा कोणी केला नव्हता. त्यात असलेलें अर्थ गांभिर्य लक्षांत कोणी घेतलें नव्हतें. खेडोपाडी सनासुदीला ढोल लेजमिच्या आणि झांजीच्या निनादांत म्हटलेल्या गाण्यांची तालबद्ध सुरेल तान पाहून फक्त कुतुहलच वाटत होतें. संबोळ घेवून येणारें गोंधळी, सारंगी घेवून येणारें फिरीस्तें, डफडें घेवून येणारे वाघे, आंबाबाईचा हिलाळ घेऊन येणारें भुतें यांनी गायीलेल्या गाण्याकडें कोणी बारकायीने पहिलें नव्हतें त्यांचा उपहासच होत होता. दिवेलागणी होतांच ओटीवर आजीनें सांगितलेल्या गोष्टी, चांदण्यांत कथेकरी बुवानीं रात्रीच्या रात्री उजडून सांगितलेल्या कथा यांकडें फक्त कुतुहल आणि मनोरंजन ह्या दृष्टीनेंच पाहण्यांत येत होतें; पण आज ह्या साऱ्या भलऱ्या, गाणी, गोष्टी, कथा याना अभ्यासाच्या दृष्टीनें महत्व आलें असून ह्या साऱ्या लोकनिर्मित साहित्याला लोकसाहित्य अथवा लोकवाङ्मय ही संज्ञा आणि नामाभिधान मिळालेलें आहे. त्याच बरोबर त्यांचे संकलन, संशोधन आणि अभ्यास सुरूं होवून त्याचा सगळीकडे गौरव होत आहे.

## लोकसाहित्य अथवा लोकवाङ्मय म्हणजे काय ?

या साहित्याला लोक साहित्य किंवा लोक वाङ्मय का म्हणतात या विषयाची व्याख्या समजावून घेणें जरूर आहे. या विषयाची व्याख्या आणि स्वरूप यासंबंधी देशी आणि विदेशी लोकानीं आपआपल्या परीनें व्याख्या आणि स्वरूप विषद केलें आहे.

लोकांनी ' लोकांसंबंधी लोकांच्या भावना व्यक्त करण्याकरीता लोकांकडून जे साहित्य अथवा वाङ्मय निर्माण झाले. तेच लोकसाहित्य किंवा लोक वाङ्मय होय. '

समाजातील अज्ञात व्यक्ति ही या साहित्याचा कर्ता व निर्माता असून जे मौखिक व परंपरेनें चालत आले तेच लोक साहित्य अथवा लोक वाङ्मय होय. हे साहित्य लोकांच्या बोली भाषेत चालत आलेले असून त्यांत समाजाच्या चालीरीती समाजाचे आचार विचार आणि संस्कृतीचे खरें दर्शन होते अशी व्याख्या केलेली आढळते.

लोक साहित्याचें संकलन, संशोधन, आणि अभ्यास सुरूं करताना पाश्चात्यानीं Folk lore हा शब्द प्रयोग रूढ केला. Folk lore याचा शाब्दीक अर्थ असंस्कृत लोकांचे ज्ञान असा आहे. पाश्चात्य विद्वानांनीं आणि या विषयाच्या अभ्यासकानीं हा विषय अभ्यासतानां समाजाचे दोन भाग पाडलेले आढळतात एक उच्च वर्ग व दुसरा खालचा वर्ग. खालच्या वर्गात सर्व सामान्य लोकांचा बहुजन समाजाचा खालचा थर जो दलीत आहे, पिडीत आहे, आडाणी आहे शिष्ट समाजा पासून बहिष्कृत झालेला आहे. हाच समाजाचा खालचा थर होय आणि Folk lore म्हणजे आपल्या भाषेतलि लोकसाहत्य हे याच समाजातील रुढी परंपरा, आचार, त्यांच्या भावना, त्यांच्या श्रद्धा लोक साहित्यात प्रकट झालेल्या दिसतात असें त्यांचे मत आहे.

Folk lore या इंग्रजी शब्दाच्या पारिभाषीक अर्थाचे दुसरें अनेक प्रतिशब्द आपल्याकडील लेखकांनीं दाखविण्याचा प्रयत्न केला. हिंदी भाषेतील अनेक लेखकांनीं ह्या लोकनिर्मित कृतीला लोकवार्ता, जनवार्ता, जनसंस्कृती, लोकशास्त्र, लोकविज्ञान, लोक परंपरा, लोकप्रतिभा, लोकसंस्कृती, लोकपथ, लोकसंग्रह तर कोणी लोकायन अशा अर्थाचे कितीतरी शब्द रूढ करण्याचा प्रयत्न केला. मराठी लोकसाहित्याच्या अभ्यासकांनीं लोकविद्या, जनवार्ता, लोकवाङ्मय असें शब्द सुचीत केलें. पण हे साहित्य ‘ लोकसाहित्य ’ म्हणूनच सगळीकडे रूढ झाले आहे. ह्या विषयाच्या व्याख्येसंबंधीं माझ्या मते या विषयाची व्याख्या खालीलप्रमाणें असावी.

सामान्य लोकांनीं सामान्य लोकांकरितां जे साहित्य निर्माण केलें ते जनसाहित्य अथवा लोकसाहित्य होय. लोक हा अलिकडील रूढ शब्द आहे व तो सगळ्यांकरितां वापरला जातो. हें साहित्य सामान्य जननिर्मित आहे, ही गोष्ट विसरतां येणार नाहीं.

लोकसाहित्याला ‘ लोकसाहित्य ’ ही संज्ञा दिल्यानें विषयाची व्याप्ती पूर्ण होत नाहीं ही अलिकडील ह्या विषयाच्या अभ्यासकांची व संशोधकांची तक्रार मान्य होण्यासारखी आहे. कारण लोकांच्या आचारा विचाराचे त्याचप्रमाणें मनोभावानीं प्रेरीत होऊन ते मुखाच्याद्वारें बाहेर येऊन परंपरेनें चालत आलेलें आहे. ह्या विषयाच्या कक्षा वाढलेल्या आहेत, हे विषय अभ्यासतांना आढळून येतें.

लोकसाहित्यासंबंधीं अनेक देशी विदेशी विद्वान आणि पंडितांनीं आपले विचार व्यक्त केलेलें आहेत. या साहित्यासंबंधीं लेनीन म्हणतात–‘ Folk Lore is Material About the Hopes and Yarnings of the People. ’

( लोकसाहित्य लोकांच्या आशा आणि आत्मभावानीं ( स्नेहसंबंधानीं ) युक्त अशी सामुग्री आहे.

या साहित्याविषयीं गांधीजी म्हणतात, ' Folk lore is the literature of the people but it belongs to an order of things that is passing away, if it has not already done so.' ( लोकसाहित्य हें लोकांचें साहित्य आहे पण ती नाहींशीं होणारी संपत्ति जर आजपर्यंत नष्ट झाली नाहीं कारण ती लोकांशीं निगडीत आहे.

पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकरासारख्या कायदे पण्डीताने, कायदा, धर्मशास्त्र, इत्यादि जडवादी विषयाशीं सतत व्यासंग असतांही त्यांनीं लोकवाङ्मयाविषयीं अत्यंत स्फूर्तिदायक आणि मौलिक विचार मांडलें आहेत, एकें ठिकाणीं ह्या लोकभाषेतील लोक वाङ्मयासंबंधींच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्व पटवून देतांना ते म्हणतात.—

मराठी वाङ्मयाची अनेक दिशेनें प्रगती होत असल्याचे अनेक मराठी साहित्यिकांकडून ऐकिवांत येतें, या संबधानें माझ्यासारख्या केवळ जुन्या वाङ्मयावर वाढलेल्या माणसाने मत देणें उचित होणार नाहीं तथापि जुन्या आणि नव्या मराठी वाङ्मयाचा परीघ तपासून पहाताना हल्लीच्या चालू वाङ्मयातून कांहीं जुनें वाङ्मय गळून पडलें आहे नव्हे नामशेष झालें आहे असें म्हणणें आतताईपणाचें होणार नाहीं असें मला निश्चितपणें वाटतें. जुन्या वाङ्मयांत लावणी आणि गाऱ्हाणें यांचा समावेश बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होत असें परंतु आजकालचें वाङ्मय पाहिलें असता या दोन वाङ्मयाचा नामनिर्देशसुद्धां सापडत नाहीं. लावणी आणि गाऱ्हाणें ही कमी प्रतिची असें जरी मानले तरी लालित्य आणि नवलाई यांच्या दृष्टीनें कमी प्रतिचे मानता येणार नाहीं. हे वाङ्मय नष्ट झालेलें पाहून मला खरोखर मोठा खेद होतो. ह्या वाङ्मयाचा संग्रह करण्याचा माझा माणस होता. परंतु कार्यबाहुल्यामुळें मला पुरें करता आलें नाहीं!!

ह्या जुन्या अलिखित, ओठावर खेळणाऱ्या आणि कालप्रवाहांत वहाणाऱ्या या मौलिक लोक वाङ्मयाचे मूल्य ह्या डॉक्टरसाहेबांच्या उद्‌गारांवरून कळून येण्यासारखें आहे.

ह्या लोकवाङ्मयाच्या बोलीभाषेच्या महतीसंबंधीं आपल्या देशाचें पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू म्हणतात ' साहित्यका प्रश्न मुझे बहुत प्यारा है और मै समझता हूँ कि हर देशके लिये उसके साहित्यका सवाल उसके जीवनसे बंधा हुआ है। कोई देश तरक्की नहीं कर सकता है अगर उसका साहित्य दुर्बल है, कमजोर है। या दुसरी तरफ उसको ले लिजिये कि अगर देश दुर्बल हो तो उसका साहित्यभी दुर्बल होगा। तो दोनों एक दुसरोंसे बंध हुए हैं। आप जानते है कि अंग्रेजी साहित्यका बहुत बडा आदमी मिल्टन हुआ है। उसने लिखा है, कोई दो–तीनसो बरसकी बात है कि

तुम मुझे किसी देशका साहित्य दो और मै उस देशकी निस्बत कुछ नहीं जानता होऊं बिलकुल नहीं कि कैसें कहाँ लोक रहते है, वह तगडा देश है या दुर्बल है, कमजोर है, तेज दिमाग है, कैसा है, सबसे बता दूंगा उसके साहित्य को देखकर कौंकि आईना या शिशा है । जिसमें आप देख सके की एक जाती या एक देश कैसा है। किन किन बातों मे वह आगे है, किस में पिछे है। तो साहित्यका सवाल एक बुनियादी सवाल है ।

देशाचें, समाजाचे, त्यातींल निरनिराळ्या जाती जमातीचें स्पष्ट दर्शन आपल्याला ह्या वाङ्मयाच्या आरशात होतें; समाजाचे अतरंग, त्यांच्या चालीरीती, त्यांचे व्यवहार, आचार विचार त्यांच्या आशा आकांशा याचा चलत चित्रपट आपल्यापुढें ह्या बोलीभाषेतील लोक वाङ्मयांच्या द्वारेच पहावयास मिळतो. इतकेंच नव्हे तर मागे सांगितल्याप्रमाणें एक काळ असा होता की. मानवाचे व्यवहार बोलीभाषेत आणि ह्या लोकवाङ्मयाच्या द्वारेंच होत असत. ह्या देशांतील संस्कृतादि महान ग्रंथाची, रामायण, महाभारत वगैरे धर्मग्रंथांची मूळ कल्पना आणि भाषा आणि त्यांतील दृशांची अनुमानें येथेंच ह्या लोकवाङ्मयापर्यंत पोंहोंचतात.

ज्या देशांतील समाजाचें जीवन समजावून घ्यावयाचें असेल त्या देशांतील लोकवाङ्मयच प्रथम तपासलें पाहिजे या संबधी प्रख्यांत रशियन साहित्यिक मॅक्झिम गॉर्की म्हणतातः—

'One cannot Know the life of the people withouf Study ing their Folk looe and Songs. त्यांचप्रमाणे दुसरा एक रशियन ग्रंथकार म्हणतों की' तरुण कोणती गाणी म्हणतात तें सांगा, म्हणजे त्या राष्ट्राचें त्या समाजाचे भवितव्य मी सांगेण.

यावरून कोणत्या देशांत कोणत्या लोकवाङ्मयाची निर्मिति होत आहे, लोकगाणी जी प्रसारीत होतात ती कोणत्या स्वरूपाची आहेत त्यांतून जनमनाचा कानोसा घेता येणें सुलभ होतें. हा विचार त्या लोकवाङ्मयाच्या आवश्यकतेचे, महत्तीचे, आणि अभ्यासाचें कार्य आवश्यक आहे ही गोष्ट आपल्याला सहज कळून येण्यासारखी आहे. लोक साहित्याचे संकलन आणि संशोधन ही राष्ट्रीय धनसंपत्ती आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाहीं.

## लोकसाहित्याचा उगम व प्रसार—

आतां आपण या विषयाचा उगम व प्रसार कसा झाला याकडे वळूं या. या साहित्याच्या उगमस्थानासंबंधीं व प्रसारासंबंधीं पाहिलें असतां या साहित्याचा उगम कोठें, कसा व केव्हां झाला यासंबंधीं अजून संशोधकांनीं स्पष्टउक्ती अथवा निश्चित काल व्यक्त केलेला नाहीं. हे साहित्य कांहींच्या मतें फार फार पूर्वकाळीं निर्माण झालें आहे. दुसऱ्या कांहींच्या

मतें ते पुराणाच्या काळापासून चालत आलेले आहे. कांहीं म्हणतात हे नवसुधारणांच्या आधींचें आहे. कोणी म्हणतात दळणवळणांची नवीन यंत्रें सुरू होण्याच्या अगोदरचा काळ असावा. अशाप्रकारें अनेक अनिश्चित मतप्रवाह दिसून येतात. अर्थात् कोणत्याहि गोष्टीची उत्पत्ति पहातांना त्या गोष्टीचा विस्तार व ऐतिहासिक परंपरा, संस्कृतिक अवशेष आणि स्थित्यंतर कळणें आवश्यक आहे. या साहित्याचा विस्तार फार मोठा आहे. हे साहित्य साऱ्या प्रांतात आभाळातल्या चांदण्याप्रमाणें पसरलेले आहे. त्याच्या पूर्णअंशी संकलना-करितां कित्येक वर्षे लागतील हे सांगणे कठीण आहे. या साहित्याचे मूळ सांपडत नाहीं त्याचे प्रमुख कारण असें आहे कीं जर सगळेच लोक साहित्य गोळा केले तर त्यात शोधताना त्यांच्या मुळाची खोली कोठपर्यंत गेली आहे हे कळेल आणि अशा तऱ्हेनें शेवटचे म्हणजे सगळ्यांत जुनें लोकसाहित्य तेंच पहिलें आणि तेथूनच त्याची सुरवात झाली असें अनुमान काढतां येईल. पण सद्यस्थितीत आजपावेतो या साहित्याचें जे संशोधन झाले आहे ते फारच थोडे झाले असून ते अल्प प्रमाणांत उपलब्ध आहे असेंच म्हणावें लागतें.

पण असें जरी असलें तरी स्थुलमानानें आणि संशोधनाच्या कसोटीनें पहातां लोक साहित्याचा कालखंड आपण ठरवूं शकतो. लोक साहित्याच्या सुरवातीचा काळ हा मनुष्य प्राण्याच्या प्रथम अवस्थेच निर्माण झाला असावा. त्याच्या प्राथमिक अवस्थेत त्याच्या राहणीत आणि पशुपक्षांच्या राहणीत फारसा फरक नव्हता. त्या काळच्या दंतकथा आणि लौकिक कथा अथवा माहीतीचे साधन आज उपलब्ध झाले नसल्यानें स्पष्ट मत प्रदर्शन करणें योग्य होणार नाही. पण भूगर्भ शास्त्राच्या मदतीनें, त्यावेळेच्या काळाचा तर्क करून अनुमान काढता येते. प्रथम अवस्थेत मनुष्य प्राण्यांस फक्त शरिर पोषणाचा विचार करावा लागत असल्यानें ते मिळविताना अनेक संकटे आणि निसर्ग सृष्टीतील चमत्कार तो जसजसा पाहू लागला तसतसें त्याच्या सुप्त अवस्थेत असलेल्या विचार शक्तिना नकळत प्रेरणा मिळाली. आणि तो प्रत्येक गोष्टीच्या निर्मितीच्या घटनेचा आणि कार्य कारण भावाचा विचार करूं लागला. आपल्या डोळ्यापुढें अनेक घडामोडी होतात त्या कशा होतात? त्या करणारे कोण? ते आपल्यापेक्षां बलवान असलें पाहिजेत असें त्याला वाटलें. त्यांचे समाधान केल्यानें आपणांसही समाधान आणि सूख प्राप्ती अथवा संतुष्ट ठेवतील नाहींतर दुःख देतील ही समजूत दृढ झाली. यानंतर विविध तत्सम अन्य कल्पना रुढ आहे कीं मनुष्य मेल्यावर तो सर्वस्वी नष्ट न होता, त्याचे अस्तित्व कायम नष्ट न होता तो कोणत्या ना कोणत्या तरी रुपानें अवनीतलावर राहतो ही समजूत चालत आलेली आहे. म्हणजे ह्या काळांत या साहित्याच्या निर्मितींची पाळेंमुळें असू शकतील पण ह्या लोकवाङ्मयाच्या उगमांची कसोटी लावली असता धर्म कल्पना रूढ झाल्यावर माणसें आपआपल्यांत हेवादावा करूं लागली आणि पुढें मनुस्मतिचा जन्म होताच एक संपूर्ण समाज एका समाजापासून उरबडून काढला.

त्यांच्यावर अन्यायाची परिसीमा झाली. त्यांचे दैनिक व्यवहार बंद करून टाकल्यावर त्यांना आपल्या मुक्या मनांतील भाव व्यक्त करण्याकरितां ह्या वाङ्मयाचा आसरा घ्यावा लागला. मनुस्मृतिही लोकसाहित्याच्या उगमनाची नांदी ठरतें. आणि पुढें जेव्हां पुन्हां बौद्ध धर्मांचेंहि ह्या देशांतून उच्चाटन करून त्यांना बहिस्कृत करण्यांत आलें. तेव्हां त्यांनीं आपल्या बांधवांना सुखदुखःखाच्या गोष्टी सांकेतिकरूपानें लोक साहित्यांतल्या आणि जातक कथा आणि नितीकथा ह्या त्यांतून निर्माण झाल्या. चिऊकाऊच्या, इट्ठकल्यामिट्ठकल्या गोष्टी ह्या त्यांनीं आपली सांकेतिक भाषा आपल्याच लोकांना कळण्याकरतां निर्माण केलेली आहे. वैदिक धर्मांचे बौद्धधर्मांवर आक्रमण झाल्यानें बौद्धजनांनीं आपल्या दैनंदिन व्यवहारांत ही लोकवाङ्मयाची भाषा सुरू केली व तिचा तेथेंच अविस्कार झाला. ह्या वाङ्मयाचा प्रत्यक्ष निर्मितीचा काळ हा बौद्धकालपासून आजच्या बौद्धापर्यंत चालत आलेला आहे.

ह्या साहित्याला लोक साहित्य म्हटल्यानें विषयाची व्याप्ती आणि मर्यादा कमी होतें. वास्तविक पहांता या साहित्याला लोक साहित्य म्हणण्याऐवजी दलित साहित्यच म्हटलें पाहिजे हे माझें मत येथें प्रथमतः स्पष्ट व्यक्त करतो. त्याचबरोबर हे साहित्य दलितांची कृति आहे आज ती सर्व सामान्य जनतेंत विस्तारलेली दिसतें यावरून या साहित्याला मी ( सामान्य जनांची ) 'जनकृती' म्हणतो अर्थात ही कृती सामान्य दलित जनांनी केलेली असल्यानें त्यातलि एक प्रकार बोलीभाषेद्वारें व दुसरा आचार विचारांतून निर्माण झालेला आहे असें जनकृतीचें हे दोन प्रकार मानावें लागतलि. सामान्य जनांनी निर्माण केलेल्या बोलीभाषेतील वाङ्मयाचा तेवढा अर्थ स्पष्ट होऊन लोकांचें निरनिराळें परंपरागत समज, वृत्त वैकल्पे, तंत्र मंत्र जादू टोणा, सण इत्यादि कृतींचा वेगळा प्रकार माणला पाहिजे. या करींता या साहित्याला 'जनकृति' हा शब्द प्रयोग वापरल्यास चूकीचे होणार नाहीं.

अशाप्रकारें जनकृतीचें खालीलप्रमाणें अंगें मानावीत.

**-: जनकृति :-**

( १ ) लोकसाहित्य ( २ ) लोकाचार

१ ) लोकसाहित्यांत येणारीं उपांगें :-
गद्यप्रकार–लोककथा–देवादिकांच्या कथा.

२ ) म्हणी, आन्हे, उखाणे वगैरे.
पद्यप्रकार

१ ) लोकगीतें :– सर्व स्त्री–पुरुषांनीं म्हटलेलीं गाणीं ओवी आणि स्त्रियांची इतर सर्व प्रकारचीं गाणीं.

२ ) शाहिरी लावणी, पोवाडे.
लोकचाराची प्रमुख उपांगे.

१ ) लोकभ्रम–परंपरागत समज, जादूटोणा, तंत्रमंत्र.

२ ) वृत्तवैकल्यें.  ३ ) सणादि कल्पना.

अशा तऱ्हेनें या विषयाची निरनिराळी अंगें आणि उपांगें मानल्यानें विषयांत लोकजीवनांच्या कक्षा पूर्णतेनें सामाविल्या जातात. विषय समजावून घेण्याच्या दृष्टीनें येथें वरील जनकृतीच्या स्वरुपाचें ओझरतें दर्शन या ठिकाणीं घडविणें जरूर आहे.

## लोकसाहित्याच्या संशोधनाचें व संकलनाचें आतापर्यंत झालेलें प्रयत्न

या साहित्याच्या संकलनाकडे आणि संशोधनाकडे दृष्टीक्षेप टाकला असतां इंग्लंड, फ्रान्स, जर्मन, रुमानिया यासारख्या देशांत या साहित्याची कार्ये अनेक लोक विद्यामंडळे ( Folk Lore Societies ) स्थापून अनेक वर्षांपासून सुरूं आहेत. आपल्या देशांत लोकसाहित्याच्या संशोधनाचें कार्य प्रथम मिशनरी लोकांनी कल. मेरी फ्रिअर या बाईनें १८६८ सालीं ओल्ड डेक्कन डेज् हे पहिलें पुस्तक प्रसिद्ध करून ह्या साहित्याच्या अभ्यासाचा पहिला पाया घातला. या पुस्तकाला त्यावेळचे मुंबईचे राज्यपाल (गव्हर्नर) सर वॉल्टर फ्रिअर यांनीं या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली. त्यांचीच कन्या मेरी फ्रिअर होय.' त्या पुस्तकाला युरोपमध्यें अमाप लोकप्रियता मिळाली त्याच्या बऱ्याच आवृत्याहि निघाल्या त्याची पांचवी आवृत्ती १८९६ सालची आहे. जर्मन हंगेरीयन आणि डॅनीश भाषेतहि त्यांची भाषांतरें झाली, त्याचप्रमाणें हिन्दीत व गुजराथीतहि या पुस्तकाची भाषांतरें झाल्याचा उल्लेख आढळतो. या पुस्तकाचा अनुवाद आपल्याकडील मराठी भाषेतील सुप्रसिद्ध लखिका आणि अभ्यासिका श्रीमती दुर्गाताई भागवत यांनीं चित्रशाळेमार्फत चार भागांत प्रसिद्ध केला आहे. त्याचप्रमाणें जेम्स कँडोल अँथोव्हेन यानींही या विषयावर लेख लिहिले. वा. दा. मुंडले यांच्या धनगरांच्या ओव्या, राजारामशास्त्री भागवत यांच्या विविध विस्तारांत गोंडी गीताच्या विवेचनाचा लेख त्याचप्रमाणें विविधज्ञान विस्ताराच्या अडतीसाव्या पुस्तकाच्या सातव्या अंकात रा. वासुदेव गोविंद आपटे यांच्या अभूद्त कथा प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्याचप्रमाणें राजवाडे यांनीं आपल्या इतिहासाच्या, ग्रंथात 'हातगा उर्फ भोंडला' त्याचप्रमाणें कांहीं लोकगीतांचा उल्लेख आढळतो. त्याचप्रमाणें कांहीं लोक गीतेंहि प्रसिद्ध केली होती. तसेंच विष्णू शास्त्री चिपळूणकरांच्या निबंधांतील लोकगीतांचे उल्लेख पूण्याच्या गॅझेट-मध्यें कांहीं उखाण्यांचे नमुनें श्री कुंठे यांनीं लिहिलें असून श्री. लेले यांच्या धर्म मासि-कांतील स्त्रीयांच्या गीतांचा भाग निर्णयसागर प्रकाशनाचा 'स्त्री' गीत संग्रह १८७२ मध्यें प्रसिद्ध झाला. त्याचप्रमाणें १८९५ मध्यें श्री. चाफेकरांनीं लिहिलेला 'बदलापूर' 'आमचा गांव' इत्यादि लोकसाहित्यावरील प्रकाशन झाले असून महाराष्ट्रांतील जूनीं गीतें साहित्याचे मूलधन हे वामन चोरघड्यानीं लिहिलें आहेत. त्याचप्रमाणें

पा. श्री. गोन्हे तसेंच सिकंदरलाल यांनीं जुनीं मराठी गीतें प्रसिद्ध केली आहेत. काका कालेलकरांच्या बाल कथा तौलनीक इतिहास लोककथा या स्वरूपाचें साहित्य उपलब्ध केलें असून महादेवशास्त्री जोशी यांचे ‘ कथाकुंज ’ प्रसिद्ध आहे. या साहित्याचे संकलन आणि संशोधन ‘ इतिहास मंडळ, महाराष्ट्र साहित्य प्रकाशन मंडळ, महाराष्ट्र लोकसाहित्य माला व महाराष्ट्र दलित साहित्य संघ ’ या संस्थांनीं या विषयाच्याबाबतींत आपली चांगली कामगिरी बजाविली आहे. त्याचप्रमाणें अलिकडीक डॉ. इरावतीबाई कर्वे, डॉ. चि. ग. कर्वे, डॉ. कमलाबाई देशपांडे, सौ. अनुताई लिमये, सौ. मालतीबाई देशपांडे, डॉ. सरोजनीताई बाबर, श्रीमती दुर्गाताई भागवत यांनीं या साहित्याचे कार्य चांगल्या तऱ्हेनें पार पाडलें असून त्यांत दुर्गाताई भागवत, सरोजनीताई बाबर, अनुताई लिमये, मालती देशपांडे यांचा लोकसाहित्याचे संशोधक म्हणून सगळीकडे प्रामुख्यानें उल्लेख होत आहे. महाराष्ट्र लोकसाहित्य माला पुणेंतर्फे मुंबईराज्य सरकारनें या अभ्यासू भगिनींची या लोकसाहित्य संशोधन आणि संकलन याची यांच्या समितीवर सरकारनें जबाबदारी सोंपविली आहे. श्रीमती दुर्गाताई भागवत यांच्या ‘ लोकसाहित्याची रुपरेखा ’ या संशोधन ग्रंथांत अकादमीतर्फे पारितोषिक आणि पुरस्कार मिळाला असून त्यांनीं लोकसाहित्यावर अनेक लहान मोठीं पुस्तकें लिहिलीं आहेत. मालतीबाई देशपांडे यांचें ‘ लोकसाहित्याचे लेणें ’ अनुताई लिमये यांचें घाटांवरील ‘ श्रमिकांची लोकगीतें ’ डॉ. सरोजनीबाई बाबर यांचें मराठींतील ‘ स्त्रीधन ’ आणि ‘ मंगल अक्षता ’ ही पुस्तकें अभ्यासनीय आहेत. वरील महाराष्ट्र लोकसाहित्य मालेतर्फे दोन प्रकारानें झालीं असून हीं पुस्तकें वाचनीय आहेत. यामध्यें अजूनहि वैगुण्य असल्याचें आढळून येतें. त्याचप्रमाणें श्री. ना. रा. शेंडे यांचें साहित्य संपदा आ. श्री. रणापसे यांचे लेख या दलित समाजांतील लेखकांचे प्रयत्नहि कौतुकास्पद आहेत.

## लोकसाहित्य दलितांच्या संस्कृतीचें आणि साहित्याचें मूलधन आहे !!

लोकसाहित्य हे दलितांच्या संस्कृतीचें आणि साहित्याचें मूलधन आहे. ज्यावेळीं शिष्ट समाजानें इतरांना नाडले, पिडिले, समाज बहिष्कृत केलें, ज्या देवांची असलेली संस्कृत भाषा शिकण्यास बंदी केली, त्यांनीं विद्या घेणें म्हणजे महत्पाप समजण्यात येऊं लागलें. ज्यांना अक्षर शत्रू ठेवण्यांत आलें, त्यांनींच आपल्या कष्टमय जीवनांतून ह्या लोकवाङ्मयाला जन्म दिला आहे. पंडित आणि शिष्ट समाज संस्कृत प्रचुर धर्मपर ग्रंथरचना, निर्मिति आणि परिशिलणें करीत होता तेव्हा ज्यांना शूद्र मानलें गेले होते ज्यांचा आधींच उपहास केला होता त्या दलित समाजाला आपलें मन, आपल्या भावना, आपलें अंतःकरण, आपला उद्वेग इत्यादि मनोविकार व्यक्त करण्याचें लोकवाङ्मय हेच एकमेव साधन होते. शिष्ट समाज त्यांच्या आचार विचारपर धर्मग्रंथ

वेदाहि शास्त्रा भोवती पिंगा घालीत होता त्यावेळीं दलित जनांच्या लोक साहित्याला बहार आला होता.

वेद चार असून पांचवा वेद हा गंधर्व वेद. त्याचा त्यांतील गण ह्या शब्दाचा खरा अर्थ शूद्रांच्या टोळीचा गण होय. जो गणांचा म्होरक्या त्याला विद्वत्ता आणि विद्या कळत होती. गणागणात भांडणें होऊन गणांची पूजाहि होत होती. नदीचा वेग बदलण्यास ज्याप्रमाणें शंमर वर्षे लागतात तसेंच कलेचा विकास होण्यास कांहीं काळ लागतो. वेदकाळा लोकसाहित्याचा विकास झाला होता आणि त्यांतूनच देवाला आळविण्याकरितां संगीत निर्माण झालें.

खऱ्या अर्थानें पाहिलें असतां लोकसाहित्य हाच खरा पांचवा वेद होय आणि दलितांनीं निर्माण केलेली गाणी, आणि गीतें ही त्यांतील स्तोत्रे होत !

'प्राचिन महाराष्ट्र' ह्या ऐतिहासिक ग्रंथाचे कर्ते आणि एक विद्वान महाराष्ट्रीय संशोधक डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर आपल्या 'प्राचिन महाराष्ट्र' ह्या ग्रंथांत एके ठिकाणी म्हणतातः—

'संस्कृत भाषेचा इतिहास लिहिला गेला आहे. पण तो लोकस्थिती दर्शक नव्हे, लोकांचें वाङ्मय चोहोकडें प्राकृतच होतें. संस्कृत आणि प्राकृत यांची वाढ बरोबरच होत होती.'

ते पुढें असेंही म्हणतात कीं प्राकृतामध्यें सूतांचा वर्ग होता आणि त्यांना राजाश्रयही होता. जेव्हां सूतांनी जमविलेलें वाङ्मय संस्कृत पुराण ग्रंथांत निविष्ट करण्यांत आलें तेंव्हा संस्कृत व पौराणिकांचें महत्व वाढलें असले पाहिंजे आणि सूत्तांचें कमी झालें असलें पाहिजे.

डॉ. केतकरांच्या या संशोधनामुळें लोक वाङ्मय हे व्यक्तिच्यांच भोंवती कसें फिरत होतें हे स्पष्ट होण्यास त्यांच्या ऐतिहासिक दाखल्याने माझ्या मतांस किती तरी मोठा दुजारो मिळतो.

महाराष्ट्राचे दुसरें एक महाराष्ट्रीय विद्वान कै. राजाराम शास्त्री भागवत म्हणतात कीं महारामांगाची बोली हेच मराठी भाषेचे शुद्ध व असंकीर्ण स्वरूप त्यानी महारा-मांगाच्या बोलीचा एक शब्द कोशही तयार केला होता. ही भागवतांची लोकवाङ्मया-विषयींची दृष्टी ह्या वाङ्मयाचे सत्य स्वरूप प्रकट करतें. आजही महारामांगानीं गायिलेल्या लोकगाण्यांतील पवाड्या, लावण्याची किमया पुढें शाहीरीच्या स्पष्टीकरणांत येईलच. या बोलीतून या महारामांगानी निरनिराळ्या प्रांतात, विभागात आणि ग्रंथरचणेच्या भाषेत न सापडणारी विपूल शब्द संपत्ती, नाना रसानी युक्त अस शब्दप्रयोग आणि वाक्प्रचार आणि भाषेचें विविध गुण त्यांच्या बोलीतून दिसून येतात.

हे लोकवाङ्मय दलित समाज्याच्याच अभिरुचिचे कसें आहे व त्याच समाजांतून त्याची परंपरा व स्थान कसें प्राप्त झालेले आहे हे सांगतांना आपल्या लोकसाहित्याच्या रुपरेषेचा प्रस्तावनेंत श्रीमती दुर्गाताई म्हणतात लोकसाहित्याचा खूप मोठा भाग अत्यंत हिडीस, कंटाळवाणा व जनतेच्या बुद्धीस मागे खेचून नेणारा आहे. लोककाव्य, लोकनृत्य व लोकनाट्ये परंपरेनें अशिक्षितांतच टिकलेलें असतें. अभिजात कलाकृतीची पातळी हे साहित्य क्वचितच गांठू शकतें.

अर्थात दुर्गाताईंच्या मतें हे साहित्य जरी अभिजात कलाकृतीची पातळी गांठू शकले नाहीं, तरी एक गोष्ट यांतून निर्विवाद स्पष्ट होतें कीं, अभिजात कलेलादेखील लोकसाहित्याच्यामुळेंच अभिजात स्वरूप प्राप्त झालें आहे. याचा स्पष्ट अर्थ असा आहे कीं, हे साहित्य–वाङ्मय अशिक्षित, अडाणी अशा दलित वर्गीयांतच टिकलें, रुचलें, आणि चालत आलेले आहे.

त्याचप्रमाणें सौ. अनुताई लिमये यांनीं महार, मांग, चांभार या जातीच्या लोकांची लोकगीतें एकत्र केली आहेत, त्या आपल्या पुस्तकांच्या प्रस्तावनेंत म्हणतात– ह्या गीतांचा उगम श्रमिक दलितांच्या शोक, दुःख, हर्ष इत्यादि अनुभूतींतूनच निर्माण झालेलें आहे.

अशा तऱ्हेनें हे साहित्य दलितांच्या अभिव्यक्ति अनुभूती आणि अभिरुचीशीं एकरुप झालेलें आहे. दलित समाजाचा खराखुरा आणि सत इतिहास जर कोठें पहावयाचा असेल तर तो कोणत्याहि गॅझेटमध्यें अथवा शिष्ट समाजानें विकृत स्वरुपांत लिहिलेल्या इतिहासांत सांपडणार नाहीं तर दलित समाजांतील जाती जमातींच्या जीवनांतील घडामोडी, त्यांचें शौर्य, त्यांचें दैन्य आणि त्यांच्या दास्याचा ज्वलंत घटनांनीं परिपूर्ण असलेला इतिहास यांत सांपडेल. कारण त्यांनींच लोकवाङ्मय निर्माण केलें असल्यानें त्यांच्या जीवन इतिहासाची नोंद लोकवाङ्मयानेंच घेतली आहे. अर्थात हें कार्यहि एक अभ्यासाचा विषय होईल !

## लोकगीतें

'लोकगीतें' हा लोकसाहित्याच्या ताटव्याला लागलेला आणि बहरलेला फुलोरा आहे ! फुलांचे नाना रंग जसे ताटव्याला असतात तसेंच समाज जीवनाच्या, सुख-दुःखाच्या साऱ्या छटा ह्या लोकसाहित्याच्या 'लोकगीत' रुपी फुलोऱ्यांत आहेत. कोरांटीच्या फुलांपासून चाफ्याच्या फुलापर्यंतच्या माधुर्यानें हा ताटवा जसा भरलेला असतो, तद्वतच समाज जीवनाच्या विविध (थरांतील) समस्यांनीं हा 'लोकगीत' रुपी फुलोरा परिपूर्ण भरला आहे.

जी वस्तु सुंदर असेल तिलाच चित्रकलेंत स्थान मिळालें पाहिजे ही परंपरागत कल्पना जाऊन निसर्गातील कुरुप आणि ओंगळ वस्तूंचे यथातथ्य लेखन

११ अनुक्रम २५८१८ वि: १७७८
क्रमांक ११८८ नों: दि: २८।१२

चित्रकारानें केलें असेल तर ती कलकृती ज्याप्रमाणें सुंदर समजण्यांत येऊ लागली त्याचप्रमाणें अज्ञानी, निरक्षर, अडाणी, खेडवळ लोकांनीं आपल्या मनांतील भाव व्यक्त करण्याकरितां गीतें गायिली अर्थात ती गीतें म्हणजे लोकांनीं गायिलेली म्हणून त्यांना लोकगीतें म्हणण्यांत येऊ लागलें. आपण ह्या लोकगीतसंबंधीं विचार करू या.

## लोकगीतें म्हणजे काय !

'लोकगीत' हे गाणें म्हणजे भावगीत (Lyric) किंवा ललित कृति असून त्याला चाल असते. लोकगीताचा उगम निरक्षरांत झाला असून त्याचा कर्ता अज्ञात अनामिक असतो. लोकगीत ही भूतकालांतील कलाकृति असून पुष्कळदां शतकाची परंपरा तिच्यामागें असते. ही लोकगीताची व्याख्या सगळीकडे रास्त मानण्यास हरकत नाहींत.

लोकांच्या सामुहिक भावना आपल्याला लोकगीतांत दिसतात. त्या जुन्या अलिखित गीतांना आपण लोकगीतें म्हणतों व जें शिक्षणाच्या, छापण्याच्या व प्रसाराच्या शुद्धता आणि भाषाशास्त्र यांच्या चाकोरीमुळें तसेंच व्याकरणाच्या दृष्टीकोनांतून लिहिलेल्या पंडिती लिखाणाला प्राधान्य दिलें गेलें आहे. पंडिती लिखाणांत आणि काव्यांत जशा कल्पना, रस, अलंकार आहेत तद्वतच लोकगीतांत विविध अलंकार, नाना रस, सौंदर्य, रसिकता, वात्सल्य, श्रद्धा, प्रणय, विनोद, वर्णनशैली वगैरे गुण पुरेपुर भरलेले आहेत. ज्या ज्या भावना जीवनांत आपल्याला अनुभवास मिळतात; त्या साऱ्या भावनांचे सहज सुंदर चित्र ह्या लोकगीतांत आढळतें. नादमाधुर्य, निसर्गवर्णन यांचा गोड मिलाफ लोकगीतांत झालेला असतो. गेयता हे लोकगीताच वैशिष्ट्य आहे.

भाऊजईबाई उंच जोत्याची पायरी । ताईत जोत्यावरी चंद्र निघतो बाहरी ॥

तसेंच :—

वाटनं कोण येतो येव्हढा मंजूळ चालणीचा । उंच जोंधळा पल्लणीचा ॥

या गीतांतील ओळी पाहून त्यांच्यातील कल्पकता उपमा पाहून हे खेडुतांचे बोल किती कलात्मक आहेत हे आपल्याला दिसेल.

ह्या लोकगीतांचा उगम श्रमिक, दलितांच्या शोक, दुःख हर्ष इत्यादि अनुभूतीतूनच झालेला असल्यानें त्यांच्या मनाच्या आंदोलनाचें हेलकावे आपल्याला दिसतात.

## लोकगीतें व समाजव्यवस्था

या ठिकाणीं महाराष्ट्रांतील लोकगीतांचा परिचय करून घेत असतां महाराष्ट्रांतील समाज व्यवस्था, जाति व्यवस्था यांकडे दृष्टीक्षेप टाकणें महाराष्ट्राच्या खऱ्या लोक जीवनाच्या दृष्टीनें अधिक उचित ठरेल.

१०२८३

कोणाहि लोकगीतांच्या संकलन आणि संशोधन करावयास निघालेल्या अभ्यासकाला मराठी मुलखातून फिरावयाचे झाल्यास त्याला कोणत्याहि गांवांत शिरतांना गांव तेथें महारवाडा असल्याचें दिसेल; गांवगाडा सुव्यवस्थित चालण्याकरितां अठरापकड जाति आणि बारा बलुती दिसतील.

गांवातील बारा बलुती म्हणजे 'ग्रामरुपी नाट्याच्या रंगभूमिवरील निरनिराळीं पात्रें आहेत; आणि प्रत्येकाचें वैशिष्ट्यहि वेगवेगळें आहे. महाराष्ट्रांत एकंदर जी लोकसंख्या आहे त्याच्या एकचतुर्थांश हिस्सा केवळ दलित–अस्पृश्य समाजाचा आहे त्यांत (आदिवासी) गोंड, कचर, वारली, कोळी, कोळी, कोकू, परधान, भिल्ल, दाढिआ, कातकरी, कुकना, तसेंच चांभार, ढोर ह्या जाती असून सर्वांत अवमानीत जाती महार व मांग ह्या आहेत. वरील सर्व अस्पृश्य जातींत महार ह्या जातीची सर्वांत अधिक लोकसंख्या आहे. ह्या सर्व जातीमुळें महाराष्ट्र समाजावर व मराठी मुलखाच्या इतिहासावर कांहीं परिणाम होणें शक्य नाहीं असें कोण म्हणेल!

वरील सर्व जाती जमातीना हिंदू संस्कृतीनें अत्यंत छळलें व जर्जर केलेलें आहे. असह्य परिस्थितीत हा समाज चालत आला आहे. आपल्या मनाचा कोंडमारा उघडा करून दाखविण्यास त्यांना एकच मार्ग मिळाला. तो म्हणजे 'लोकगीत!' ह्या सर्व समाजाच्या मुक्या मनाचे इशारे आणि सुस्कारे लोकगीतांच्या उगमाशीं जाऊन भिडतात. लोकगीतांतील वास्तवता ही ह्या दलित जाती जमातीच्या अंतःकरणाच्या पडद्या पडद्यांत आणि पापुद्र्यांत पापुद्र्यांत आढळतें.

## ओवी

शुक्र तारा ढळला आहे. पूर्व दिशा तांबडी दिसूं लागली आहे. जात्यावर बसलेली माऊली मंजूळ ओवी गात आहे. पाखरं त्या मंजूळ ओवीच्या मधुर नादानें जागी झाली आहेत. दिनराजाचे अगमन अजून झालेले नाहीं. घराघरांत जाते फिरत आहे. ते जणूं पृथ्वी फिरत असल्याचे द्योतक आहे असें वाटतें. जात्याच्या चक्राप्रमाणेंच महाराष्ट्र माऊलीचे जीवन दिवसभर गर गर फिरत असतें. या ओवी गीताचा महिमा फार मोठा आहे. ह्या ओवी गीतांच्याद्वारें आपल्याला महाराष्ट्राच्या आणि मराठी मुलखाच्या कुशीत जन्माला आलेल्या माऊलीचे दर्शन होते. ती आपल्या अंतःकरणाचा कोंडमारा ह्या गीतांत व्यक्त करते. आपली सुखदुःखें, आपल्या मनांतील प्रेमळ भक्तिभाव ती व्यक्त करते. वेद काळांत अस्पृशाना ज्याप्रमाणें गुलामाप्रमाणें वागविले जात होते त्याचप्रमाणें स्त्रीयांनाहि गुलामाप्रमाणें वागविले जात होते. आणि त्यातूनच आपल्या दुःखाचा उमाळा 'राजस पाखरां जा माझ्या माहिरा' ह्या शब्दानीं त्यानीं आपल्या दुःखाचा उमाळा व्यक्त केला. या अज्ञानी असलेल्या या स्त्रीयांच्या हृदयाचे सत्य दर्शन

त्या ओवी गीतांत आपल्याला घडते. ह्या तीच्या ओबड धोबड शब्दांत विश्व भरलेले आहे. यांत शुद्धता नाहीं पण अर्थ गांभिर्य आहे. काव्यांच्या तांत्रीक नियमाची पुरेंपूर दखल घेतली नसली तरी काव्याहून अधिक श्रेष्ठ गुण या काव्य गीतांत आहे. ही ओवी गाणारी अडाणी स्त्रीही कवियत्रीच आहे.

## लोकगीतांचे पुरातनत्व

ही ओवीगीते मराठी भाषेच्या पूर्वी पासून चालत आलेली आहेत. जसा काळ बदलत जातो तसा त्याच्या स्वरूपातहि बद्दल झालेला आहे. ओवी ही स्त्रीनेंच निर्माण केलेली आहे. ह्या ओवींतील शब्द आणि भाषा पाहिली तर दररोजच्या जीवनांतील घरगुतीच आहे. तिच्यावर शहरीं भाषेचा साज चढलेला आहे, हे बदलत्या संस्कृतीचें द्योतक होय. ह्या ओवी गीतांत अलंकार आहेत, म्हणी आहेत, वाक्प्रचार आहेत, अनुप्रास यमके यासारखें भाषागुण तींत असून नाना उदाहरणें, विविध कल्पना आणि अलंकार हे काव्यगुण पुरेपुर आहेत. त्याचप्रमाणें समाजस्थिती आणि सामाजिक इतिहास हाहि या ओवीगीतांत प्रतित होत असून वाङ्मयाचें सांस्कृतिक वाङ्मयीन आणि भाषा इत्यादि गुणहि या ओवीगीतांत समजतात.

## शाहीरी ही फारशी नव्हे

शाहीर हा शब्द फारशी भाषेतून आलेला आहे आणि हा काव्य प्रकारही उर्दूतूनच आला असावा असें विसंगत व चूकींचा दृष्टीकोन मांडला जातो. ह्या महाराष्ट्रावर १३५८ पासून १६५६ पर्यंत मुसलमानांचें राज्य असल्यानें शाहीर कलगी तुरा वगैरे शब्द मराठी भाषेत येणें स्वाभाविकच आहे पण ती कलाही त्यांच भाषेतील आहे असे म्हणणे चूकीचे आहे.

शाहीर म्हणजे कवि. तमाशा म्हणजे एक रमणीय, प्रेक्षणिय दृश्य होय ! अशा या शब्दांचे अर्थ आहेत. शाहिरी हा शब्द जरी फारशी असला तरी तमाशा आणि पवाडा हे अस्सल मराठमोळें शब्द आहेत. हे फारशी शब्द मराठींत येण्यापूर्वीपासून ही कला या महाराष्ट्रांत नांदत होती. शाहीरी हा महाराष्ट्र संस्कृतीच्या अनेक कलांचा घटक आहे यांत कोणताही संदेह नाहीं.

पोवाडा हा शब्द ज्ञानेश्वरीच्याही पूर्वी म्हादबांबाई नांवाच्या कवियत्रीच्या गाण्यांत गाईन पवाडे या शब्दांत हा शब्द सापडतो.

## शाहीरी ही दलितांची कला आहे

अध्यात्मिक काव्याशिष्ट समत असल्यामुळें पाठांतर व मुखोद्गत् झालें, त्यामुळें ठराविक भाग आपल्यापुढें आज लेखनिबद्ध रूपानें उपलब्ध आहे. शृंगारीक काव्य

अश्लाध्य मानलें गेले, आणि त्यामुळें त्याला कागदावर लेखनिबद्ध होण्याचा मान मिळाला नाहीं.

शाहीरी दलितांचीच कशी याकरितां ही बाब अनेक गोष्टीनें पटवून देतां येईल.

शाहीरीचे एक उपासक आणि मराठी साहित्यांतील एक सुप्रसिद्ध साहित्यिक अण्णा भाऊ साठे दलितांच्या शाहीरीविषयीं म्हणतात—

'शाहिरी शुद्राचीच कशी ?' याचा थोडक्यांत असा खुलासा करतां येईल कीं, आदिमानवानें जगण्याचें साधन म्हणून प्रथम धनुष्य निर्माण केलें आणि त्या धनुष्याचा टणत्कार त्याच्या कानांत घुमत राहिला. तो दीर्घ हुंकार करणारा स्वर त्या मानवानें पकडला. पुढें त्याच स्वरावर माणसानें प्रतिभेचे अनेक संस्कार करून तंतुवाद्य निर्माण केलें. मापट्याला चामड्यानें मढवून त्यांत एक तंतू बसवून त्यानें तुणतुणें करून व शिंगटाची खुंटी बसवून त्यानें तो स्वर काबूत आणला. आणि त्या तुणतुण्यावर माणूस गाऊं लागला. वरचीं खुंटी पिवळून तो त्या स्वराला कमी अधिक करूं लागला आणि जेव्हां तुणतुण्यामार्फत तो स्वर माणसाच्या कक्षेंत आला तेव्हां तो बेभान होऊन गाऊं लागला. त्यानें गगनाला गवसणी घातली.

शिंग, चामडे आणि तंत या अपवित्र मानलेल्या साहित्यापासून तयार केलेल्या आपल्या त्या तुणतुण्यावर शंकराचार्यांच्या शरिरभाष्यावरच्या महाभाष्यावर तो दलित लावण्या करून गाऊं लागला. त्यानें त्या काळचें नियम झुगारून दिलें आणि अध्यात्मापासून वेदांतापर्यंत सर्वच विषयावर कवनें रचून गाऊन आपल्या दलित बांधवांना त्यानें जागृत केले. 'नक्रगजेंद्र दोघं भांडती याची कोणती यात। नात्यानं पहिलं कोण होतं ?' असा सवाल दलितानें विचारला होता. भेदिक लावण्या, खुणेच्या लावण्या गात गात त्यानें पुढें वीररसाचा वैभवशाली पोवाडाहि गायिला. त्याच्या कवनांतून अन्यायाविरुद्ध आग पाखडली जावूं लागली. तालबद्ध गतीनें स्वरावर कंठ धुमून एक दिव्य चमत्कार घडला. त्या शाहिराचीं कवनें ऐकणारें धुंद झालें. विद्वान दिपले, नी 'महारा–मांगाचं गाणं, कुणब्याचं दाणं आणि बामणाचं लिहिणं' अशी एक म्हण सर्वतोपर रुढ झाली. महार–मांगाच्या त्या शाहिरानें ब्राम्हणाच्या ज्ञानाची, शेतकऱ्याच्या धान्याची बरोबरी केली. म्हणूनच महाराष्ट्राची शाहीरी ही दलितांची शाहिरी आहे. असें छातीठोकपणें सांगायला आम्हाला मुळीच भिती वाटत नाहीं.

पुढें एका ठिकाणी अण्णाभाऊ म्हणतात ह्या महाराष्ट्राचें रक्षण करतांना दलितांच्या ह्या शाहीरानें फार मोठी कामागिरी बजावलेली आहे.

'शेजेची बाईल द्यावी पण इमान देऊं नये' असें मराठी शाहीरानें कडाडून महाराष्ट्राला बजाविलें. शाहिराने देशाला इमान शिकविलें म्हणून आघाडीला तलवार नि पिछाडीला शाहीरी खणखणली आणि प्रबळ वैरी जेरीला आला.

 ११८८ नों: दि: २४।१२।५४

पोवाडे ऐकून दुर्बलांत प्रबलता पैदा झाली सामान्य माणसें अचाट कार्य करूं लागली. त्याचे कारण आमच्या शाहीरीत विजेचा खणखणाट होता आणि बाईल द्यावी पण इमान देऊं नये. अशा शब्दाची त्याच्या तोंडातून आग वर्षत होती, म्हणूनच माणसें झटून कटून हा महाराष्ट्र राखूं शकली. नाहींतर या देशाचें नांवच उरलें नसतें.

मराठी राज्यात अशा मर्दांच्या तलवारी झिजल्या तशीच आमची शाहीरीही कारणी लागली आहे परंतु तें शिवाजीच्या तलवारीनें नि दलितांच्या शाहीरीनें प्राप्त केलेलें राज्य पुढें रंगेल राज्यकर्त्यांच्या इच्छेवर हुकूम रंगीबेरंगी बनलेल्या नव्या लावणीनें गारद केलें हेही विसरून चालणार नाहीं.

पुढें मुसल्मानी काळांत तिला उत्तेजनच मिळालें आहे. बायकामुळें उत्तर देशीं ठेवून या दाक्षिणी मुलुख गिरीवर जिवंत राहिलों तर वर्षाकाठी गांठ पडणार, नाहींपेक्षां या गनिमी देशांत फुकट जीव जाणार. या आनावस्थेंत मुसल्मान फौजांनीं जो सक्तीनें जुलुम आरंभिला त्यांतून सूटकेचा मार्ग म्हणून किंचितशा दिरंगाईची सवड कां होईना एखाद्या फर्मास लावणीकारानें त्यांची खुशमस्करी आरंभिली तर ती राजपेशा कलाकरांच्या हौशेखातर श्रेष्ठता, कर्तव्य, पूर्तता तर सनातनी धर्म रूढीच्या कठोर नियतीचा धन परंपरा ब्राम्हणी भोजनाकडे, दैनिक लिलांकडे व त्या कलेंचा सर्व मक्ता ब्राम्हणाकडे, मग पद दलितांना कष्ठाशिवाय कलेंत भीक मागण्याचें साधन मुसलमान फौशी रंगेलाच्या उत्तेजनानें येथें शक्य होतें; म्हणून महाराष्ट्रांतील कोणत्याही महारवाड्यांत आणि मांग वाड्यांची चौकशी करा तिथें दरएक पिडीत छोट्या मोट्या स्वरूपाचा कोणता ना कोणता तमाशा हा होतांच हे प्रमाण इतरांना लागूं शकत नाहीं.

आज ह्या मऱ्हाठी मुलखांत एकूण ६०० फड आहेत त्यांत महार, मांग आणि कोल्हाटी ह्या जमातीचेच लोक ही कला जतन करून फिरत आहेत.

त्यांच्या ते अभिरुचीचे प्रमुख स्थान आहे त्यानेंच तिचा विकास केला. ही सामान्य जनांची, मराठमोळी कला असून तिला बोली भाषेतील नानारंगाच्या शब्द संपत्तीच्या खड्या घालून तिचा भरजरी पितांबर निर्माण करून तिला दलितांनींच नटविलेली आहे. शिष्ट समाजानें कितीही नाकें मुरडली तरी दलितांच्या हृदयांत तिला जे स्थान मिळालें आहे ते नाहींसें होणें अशक्य आहे.

मूळांत चांगल्या असलेल्या हिंदुधर्माला कांहीं धर्ममार्तंडांनीं आणि पाखंडीवृत्तीच्या शिष्टांनीं स्वतःला शहाणें समजून घेणारांनीं आपली अकलहुषारी चालवून धर्माचा नाश केला, त्याचप्रमाणें शाहीरीतील लावणीचे, तमाशाचे वगांचे आणि त्यांतील बोलीभाषेचे, मराठमोळे स्वरूप संस्कृतप्रचुर शब्द घालून आणि पंडिती शब्दांशी जोड देऊन शाहीर प्रभाकर, रामजोशी, अनंत फंदी वगैरे सुसंस्कृत

व सुशिक्षित शाहीरांनीं शाहीरीचे मूळांतील सौंदर्य व रूप बिघडून टाकलें आहे, असें माझें स्पष्ट मत आहे.

मराठी (लोकसाहित्याचे अभ्यासक) शाहिरीचे अभ्यासक आणि संशोधक स्वतःभोंवतीं फिरतात. जेवढें उपलब्ध असेल तेवढेंच पहावयाचें त्यांचीच री ओढायची आणि त्यांत ज्यांनीं कधीं तमाशा पाहिला नाहीं त्यांच्या विचारांची पुष्टी जोडावयाची ही यांच्या अभ्यासाची पद्धत होय.

त्यांना मराठी शाहिरीचा अभ्यास करणारांना शाहीर प्रभाकर, रामजोशी, सगनभाऊ, अनंतफंदी ह्या शाहिराव्यतिरिक्त इतर शाहीर दिसतच नाहींत.

पण हीहि गोष्ट खरी कीं ह्याच मराठी मुलुखांत वरील शाहीरांना धडे देणारें व स्फूर्ति देणारे शेंकडों शाहीर, तमासगीर आणि लावणीकार शेंकडों वर्षांपासून आपली कला जतन करून आहेत. त्यांनीं निर्माण केलेली कवनें जर एकत्र संपादित केला तर त्यांच्या शाहीरीचें आज ह्या मराठी मुलुखांत शेंकडों ग्रंथ निर्माण होतील इतकी कवणें ह्या अस्पृश्य माणल्या गेलेल्या दलित समाजातील शाहीरांच्या, लावणीकारांच्या आणि तमासगीरांच्या ओठावर आहेत. पण तें संपादन करण्याचे ह्या अभ्यासकांना वावडे असावे.

## लोकसाहित्याची महति आणि अभ्यासाची दिशा

लोकसाहित्य म्हणजे जीवनाच्या परंपरेचे, भाषेचे, मानवी मनाचें आणि संस्कृतीचे ऐतिहासिक विकास दाखविणारें एक मौल्यवान शास्त्र मानण्यांत येते. लोक साहित्याला एक वेगळें आस्थित्व आहे. लोकसाहित्य हा केवळ समाज शास्त्राचा विषय नसून तो एक मानसशास्त्राचाहि विषय आहे. हे आपल्याला त्याच्या अंतरंगात गेल्यानें दृष्टोसपातिस येते. कारण लोकसाहित्य हे निर्जिव स्वरूपाचे नसून ते जीवंत आहे. एका पिढीनें निर्माण केलेलें लोकसाहित्य पुढच्या पिढींत नष्ट न होतां नवा साज चढवून आपल्यापुढें येत असतें. मानव सुधारणाच्या विकासाचें, विचाराचें आणि बदलत्या संस्कृतीचे परिणाम होऊन त्याला नवा घाट प्राप्त होतो. लोकसाहित्याची प्रवाहिणी सतत वहात आलेली आहे. लोकसाहित्याची निर्मिती ही प्रत्येक देशांत प्रत्येक कालप्रवाहांत होत आलेली आहे, मात्र ह्या साहित्याचे अशिक्षित आणि अज्ञानी लोकांत स्थान विशिष्ट प्रकारचे आढळून येते. लोक–साहित्य केवळ रुढी परंपरागत विषय हाताळीत नाहीं, तर मानवी मनप्रवाहमय प्रतिक्रीया, भाषा अभिव्यक्ती इत्यादी गोष्टींचा त्यांत अंतरर्भाव होतो इतकेच नव्हेतर मानवाच्या जीवन प्रवाहाच्या कक्षा जितक्या विस्तारलेल्या असतात तितक्याच दुरवरच्या कक्षा ह्या जननिर्मित साहित्यानें व्यापून टाकलेल्या आहेत.

अशा तऱ्हेनें लोकजीवनाशीं एकरूप असलेल्या या विषयाचें संकलन, अभ्यास वस्तुस्थिती, चिकित्सह वृत्ति, सत्य इतिहास प्रतिपादन इत्यादि गोष्टी अंमलांत आणल्यानें हे कार्य चांगलें होऊं शकेल.

लोकसाहित्याचे संशोधन केवळ पदवी मिळण्याकरितां किंवा स्वतःचें नांव मोठेपणास यावें या दृष्टीनें होऊं नये, तर समाजशास्त्राचा जिवंत इतिहास, मानवी मनांचे धागेदोरे, धर्मपरंपरा, संस्कृतिपरंपरा आणि समाजधारणा कसकशी होत गेली हे याविषयींच्या अभ्यासानें समजून येईल. हे साहित्य दलित समाजाशीं निगडीत असल्यानें आणि त्यांचे जीवनही तेंच असल्यानें दलित समाजाचा इतिहास, समाजपरंपरा, या साहित्यांतच सत्य स्वरूपांत सापडूं शकेल. लोकसाहित्य हेंच दलितांचे साहित्य आहे. लोकसाहित्य हीच त्यांच्या जीवनाची वाटचाल आहे. दलितांच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक या तिन्हीं गोष्टींचा लोकसाहित्यांत सत्य स्वरुपांत आविष्कार झालेला आहे. याकरितां त्या समाजाचा अंधारातील इतिहास जर पुढें आणायचा असल्यास दलित समाजातील लेखक, अभ्यासकांकडूनच हे कार्य चांगल्या तऱ्हेनें पार पडेल.

---

लोकसाहित्यावरील भाषण
महाराष्ट्र दलित साहित्य संमेलन २ रें
२२ नोव्हेंबर १९५९

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............... वि: ...............
क्रमांक ............... नों: दि: ...............
... ग्रंथ संग्रहालय ठाणे
90283
REFBK-0010243
REFBK-0010243